**<u>किरकोळ फौजदारी अर्ज क्र. ११५६/२०२२</u>**
**<u>लक्ष्मी गुंडला वि. सोलापूर म.न.पा.</u>**
**<u>CNRNOMHSO040011612022</u>**

**<u>निशाणी क्रमांक १ वर आदेश पारीत</u>**
**(दिनांक ०४.०५.२०२३)**

१. अर्जदाराने प्रस्तुत अर्ज लग्नानंतरचे नांव **लक्ष्मी श्रीनिवास गुंडला व** लग्नापूर्वींचे नांव **लक्ष्मी भुमय्या मदनाल** स्वतःच्या **जन्म तारखेची नोंद** जन्म–मृत्यू नोंदणी रजिष्टरमध्ये घेण्याकरीता सामनेवाला यांचेविरुध्द निर्देश मिळण्याबाबत जन्म–मृत्यू नोंदणी अधिनियम, १९६९ च्या कलम १३(३) अन्वये सादर केलेला आहे.

२. अर्ज व त्यावरील सामनेवाला यांचे म्हणणे वाचले. अर्जदाराने सादर केलेल्या दस्तऐवजांचे अवलोकन केले. अर्जदारातर्फे वकील श्री. व्ही. जी. जमादार यांचे म्हणणे ऐकले.

३. अर्जदाराच्या कथनाप्रमाणे त्यांचा जन्म **दि. ०१.०७.१९८१** रोजी घोंगडे वस्ती, सोलापूर येथे झाला. परंतु नजरचुकीने व अनावधानाने सामनेवाला यांचेकडे जन्माची नोंद करावयाची राहिली. तसेच सदर **जन्म तारखेची** नोंद सामनेवाला यांचे दप्तरी उपलब्ध नसल्याचे त्यांनी अनुपलब्धता प्रमाणपत्र देवून कळविले. अर्जदाराला वैयक्तीक कामाकरीता त्यांच्या जन्म दाखल्याची गरज असल्यामुळे सामनेवाला यांनी त्यांच्या जन्माची नोंद जन्म–मृत्यु नोंदणी रजिष्टर मध्ये घेण्याचे निर्देश मिळविण्याकरीता प्रस्तुत अर्ज सादर केला.

४. निशाणी क्र. ०७ नुसार सामनेवाला यांनी लेखी उत्तर सादर करुन अर्जदाराच्या जन्माची नोंद त्यांच्या दप्तरी नसल्यामुळे त्यांनी अनुउपलब्धता प्रमाणपत्र दिल्याचे कळविले.

५. अर्जदाराने **दि. १२.१०.२०२२** रोजी प्रकाशित झालेल्या **"नालंदा एक्सप्रेस"** या दैनिक वृत्तपत्रात जाहीरनामा प्रकाशीत करुन आक्षेप मागविण्यात आला होता. परंतु अर्जदाराच्या मागणी संदर्भात आजतागायत कोणाचाही आक्षेप आलेला नाही.

६. अर्जदाराने अर्जाच्या पुष्ठ्यार्थ निशाणी क्र ०८ वर तिचे व निशाणी क्र. ०५ व ०९ वर स्वतंत्र साक्षीदार नामे पद्मावती बालाजी मदनाल व कृष्णानाबाई रामलु इटकेल यांचे सरतपासणीचे शपथपत्र सादर केले आहे. अर्जदाराने निशाणी क्र ०३ वरील दस्तऐवजाच्या यादीसह जन्म नोंदणी अनुउपलब्धता प्रमाणपत्र, अर्जदाराचे विडी कामगार ओळखपत्र, अर्जदाराचा पॅनकार्ड, अर्जदाराचे व साक्षीदाराचे आधारकार्ड सादर केले आहे.

७. जन्म–मृत्यू नोंदणी अधिनियम, १९६९ च्या कलम १३(३) अन्वये न्यायदंडाधिकारी यांनी जन्म–मृत्यू नोंदणी अधिकारी यांना जन्माची किंवा मृत्युची नोंद घेण्याकरीता निर्देशीत करीत असताना त्या व्यक्तीच्या जन्म किंवा मृत्युच्या सत्यतेबाबत पडताळणी करणे आवश्यक आहे. प्रस्तुत प्रकरणात अर्जदाराने त्यांची जन्म तारीख **दि. ०१.०७.१९८१** आहे, असे दर्शविण्याकरीता त्यांचे पॅनकार्ड व साक्षीदारांचे शपथपत्रे सादर केले, ज्यात त्यांची जन्मतारीख दि. ०१.०७.१९८१ असल्याचा स्पष्ट उल्लेख आहे. त्यावरुन अर्जदाराच्या जन्म तारखेची सत्यता पडताळली. अर्जदाराचा तोंडी व कागदोपत्री पुरावा अभिलेखावर अबाधीत असल्यामुळे अविश्वास दर्शविण्याचे कोणतेही कारण दिसून येत नाही. त्यामुळे अर्जदाराने मांडलेले कथन विश्वसनीय असल्याचे दिसून येते. सबब, प्रस्तुत अर्ज मंजूर होण्यास पात्र आहे. करीता, मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. प्रस्तुत अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. सामनेवाला सोलापूर महानगरपालिका, जिल्हा सोलापूर यांना निर्देशीत करण्यात येते की, त्यांनी अर्जदाराकडून आवश्यक नोंदणी विलंब शुल्क भरुन घेवून अर्जदार **लक्ष्मी भुमय्या मदनाल** हिच्या जन्म दिनांक **०१.०७.१९८१** या तारखेची नोंद जन्म–मृत्यु नोंदणी रजिष्टर मध्ये करावी.

स्वाक्षरीत/–
**(दिप्ती दि. कोळपकर)**
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
(महानगरपालिका न्यायालय), **सोलापूर**

दिनांक : ०४.०५.२०२३
स्थळ : सोलापूर

## CERTIFICATE

"I affirm that the contents of this P. D.F file order are same word to word, as per the original order."

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | :- | **Pratiksha Vishal Pawar.** |
| Name of Court | :- | J.M.F.C. (Municipal Court), Solapur |
| Order dictated on | :- | **04.05.2023** |
| Order signed by the Presiding Officer on | :- | **04.05.2023** |
| **Order uploaded on** | **:-** | **04.05.2023** |